# प्रकरण – सहावे

## उपसंहार

## प्रकरण - सहावे

# उपसंहार

प्राचीन भारतामध्ये राजकीय विचारांची मोठ्या प्रमाणात निर्मिती झाली व तिचा विकासही झाला. प्राचीन भारताच्या राजकीय विचारांमध्ये वैदिक साहित्य, बौद्ध साहित्य, जैन साहित्य, महाभारत, ब्राह्मणे आणि अर्थशास्त्रीय परंपरा यांचे महत्त्वाचे योगदान आहे. पाश्चात्य देशामध्ये ज्याप्रमाणे लोकशाही, राज्याचे प्रकार, प्रशासन व्यवस्था, राजकीय सिद्धांत इत्यादी राजकीय घटकांचा विकास झाला व त्यांना प्रमाणबद्ध करण्यात आले, अगदी त्याचप्रमाणे प्राचीन भारतातही त्या सिद्धांताची मांडणी केली. प्राचीन भारताच्या राजकीय विचारांच्या इतिहासामध्ये महाभारतातील शांतीपर्व, कौटिल्याचे अर्थशास्त्र व इतर अर्थशास्त्रीय लिखाण, जैन वाङ्‌मय व बौद्ध राज्यविचार यांना महत्त्वाचे स्थान आहे. जैन धर्म व बौद्ध धर्म ज्या काळात जन्मास आले ती त्या काळाची गरजच होती असे म्हणावे लागेल. जैन धर्माची स्थापना वर्धमान महावीरांनी केली तर भगवान गौतम बुद्धांनी बौद्ध धर्माची स्थापना केली. बौद्ध वाङ्‌मयामध्ये मोठ्या प्रमाणात राजकीय विचारांची मांडणी करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने दीघनिकाय ग्रंथ, मज्जिमनिकाय ग्रंथ, अंगुत्तरनिकाय व इतर त्रिपिट ग्रंथ यांचा उल्लेख करावा लागेल. गौतम बुद्धांच्या पूर्वजन्मीच्या ज्या जातककथा संग्रहीत केल्या आहेत त्या जातककथेमध्येही आपणास राजकारणाचे मूलभूत विचार आढळून येतात.

बौद्ध राजकीय विचार प्रणालीची सुरूवात स्वतः गौतम बुद्धांपासून झाली. त्यामुळे त्यांना बौद्ध राजकीय विचारांचे जनकच म्हणावे लागेल. गौतम बुद्धांनी वेगवेगळ्या प्रसंगी आपल्या शिष्यांना, राजांना व त्यांच्या अमात्यांना केलेल्या उपदेशाद्वारे त्यांचे राजकीय विचार प्रकट झाले आहेत. गौतम बुद्धांच्या या विचारांचे तत्कालिन समाजावर अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात परिणाम घडून आले. बौद्ध विचारांमधील समता, न्याय, बंधुता तत्त्वामुळे तत्कालिन चातुर्वण्य व्यवस्थेला धक्के बसू लागले व तिच्या मर्यादा शिथिल होण्यास सुरूवात झाली. वर्णधर्मापेक्षा शुद्ध


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

नैतिक धर्मास अधिक पाठबळ मिळू लागले. गौतम बुद्धांचा जन्म शाक्य गणराज्यामध्ये झाला. ते लोकशाही आणि गणराज्य व्यवस्थेचे पुरस्कर्ते होते. गौतम बुद्धांनी प्राचीन भारताच्या राजकीय इतिहासामध्ये लोकशाही, व गणराज्यविषयक विचार, चक्रवर्ती राजा, राजकारणाचे नवे प्रतिमान, सामाजिक करार व राज्याच्या उत्पत्तीचा सिद्धांत, अहिंसात्मक मार्गाने युद्ध टाळण्याचे उपाय इत्यादी अनेक महत्त्वाचे सिद्धांत मांडले. गौतम बुद्धांनी आपल्या सामाजिक विचाराद्वारे समाजव्यवस्थेवरील यज्ञीय संस्थेचे व ब्राह्मणांचे श्रेष्ठत्त्व नाकारले. गौतम बुद्धांनी धर्म, नीती आणि राजकारण यांना एकत्र आणून नीती व धर्मावर आधारलेले राजकारणाचे नवे सिद्धांत मांडले. चक्रवर्ती राजा हा त्याचाच परिणाम होतो. गौतम बुद्धांनी मांडलेले उपरोक्त विषय आजही महत्त्वाचे व प्रस्तुत ठरतात. तेव्हा गौतम बुद्धांचय या सर्व राजकीय विचारांची प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये मांडणी करण्यात आली आहे.

**संशोधनातील प्रकरणांचा सारांश -**

प्रस्तुत शोधप्रबंधाची मांडणी एकूण पाच प्रकरणांमध्ये करण्यात आली आहे. त्यांचा सारांश खालीलप्रमाणे –

## प्रकरण पहिले

## विषयप्रवेश

प्रस्तुत शोधनिबंधाच्या पहिल्या प्रकरणाची विभागणी दोन भागामध्ये करण्यात आली आहे. पहिल्या भागामध्ये प्रस्तावनेअंतर्गत गौतम बुद्धांच्या राजकीय विचारांच्य व एकूणच प्राचीन भारतीय राजकीय विचारांच्या अनुषंगाने थोडक्यात मांडणी करण्यात आली आहे. त्याचबरोबर सदर शोधप्रबंधाची संशोधनपद्धती, विषय निवडीचा उद्देश, अभ्यासाची साधने याची मांडणी केली आहे.

गौतम बुद्धांनी जे राजकीय विचार मांडले ते अत्यंत महत्त्वाचे आहेत व प्राचीन भारताच्या राजकीय इतिहासामध्ये ते महत्त्वाचे ठरतात. गौतम बुद्धांनी मांडलेला सामाजिक कराचा सिद्धांत, राज्याच्या उदयाचा सिद्धांत, चक्रवर्ती राजाची संकल्पना महत्त्वाची आहे. स्वत: गौतम बुद्ध लोकशाही व गणराज्यव्यवस्थेचे पुरस्कर्ते होते.

त्यांना राज्या-राज्यातील, राष्ट्रां-राष्ट्रांतील संबंध हे शांतता आणि सामंजस्य या तत्त्वावर आधारलेले असावेत असे अभिप्रेत होते. आपण गौतम बुद्धांच्या राजकीय विचारांची विभागणी खालीलप्रमाणे करू शकतो –

१) गौतम बुद्धांचे वर्ण व जातीव्यवस्था विषयक विचार.

२) गौतम बुद्धांचा राज्याच्या उत्पत्तीसंबंधीचा सामाजिक कराराचा सिद्धांत.

३) गौतम बुद्ध आणि प्राचीन भारतातील लोकशाही राज्यसंस्थांची कार्यप्रणाली.

४) गौतम बुद्धांचे शांतता आणि सामंजस्यविषयक विचार. गौतम बुद्धांनी हे जे राजकीय विचार मांडले ते महत्त्वाचे आहेत.

या प्रकरणाच्या दुसऱ्या भागात गौतम बुद्धांचे संक्षिप्त चरित्र सांगण्यात आले आहे. गौतम बुद्धांचा जन्म इ.स.पूर्व ६व्या शतकाच्या मध्यावर शाक्य गणराज्यामध्ये झाला. त्यांच्या वडीलांचे नांव राजा शुद्धोधन होते, तर आईचे नाव महामायादेवी असे होते. महामायादेवीच्या मृत्यूनंतर त्यांचे पालन-पोषण त्यांची मावशी महाप्रजापती गौतमी हिने केले. गौतम बुद्धांचे मूळ नांव सिद्धार्थ होते. त्यांचा जन्म लुम्बिनी येथे झाला. सिद्धार्थ गौतमाचे बालपण अत्यंत लाडात व कौतुकात गेले. असित देवल ऋषींनी केलेल्या भविष्यवाणीच्या राजा शुद्धोधनाच्या मनावर परिणाम झाला व आपल्या मुलांचे परिव्राज्यक बनण्यापेक्षा चक्रवर्ती राजा व्हावे म्हणून कसोशीने प्रयत्न केले. त्याला ऐहिक सुखामध्ये ठेवण्याचा प्रयत्न केला परंतु; सिद्धार्थ गौतम त्या सुखामध्ये रमले नाहीत. तेव्हा राजा शुद्धोदनाने त्यांचे लग्न तारूण्याच्या सुरूवातीसच दंहपाणीची मुलगी यशोधरा हीजबरोबर लावून दिले. सिद्धार्थ गौतमास राहूल नावाचा एक मुलगा ही झाला.

सिद्धार्थ गौतमाचा शाक्यांच्या नियमानुसार २१व्या वर्षी शाक्य संघामध्ये प्रवेश झाला परंतु शाक्य संघाचा सभासद झाल्यनंतर फक्त अवघ्या आठव्याच वर्षी सिद्धार्थ गौतमांचा शाक्य संघाबरोबर रोहिणी नदीच्या पाणी वाटपावरून मतभेद जाले. त्यामुळे शाक्य संघाने त्यांना देशत्यागाची शिक्षा ठोठावली. त्यावेळेस सिद्धार्थ गौतमाने परिव्रज्या धारण केली व देशत्याग केला आणि सिद्धार्थ गौतमाचे हेच 'महाभिनिष्क्रमण' ठरले.

परंतु, बौद्ध विचारवंताची याला अजून मान्यता नाही. त्यांच्या मते, सिद्धार्थ गौतमाने जरा, मरण, वात, व्याधी या गोष्टी पाहिल्यानंतर परिव्रज्या धारण केली व मानवी दु:खाच्या शोधार्थ 'महाभिनिष्क्रमण' केले.

गौतम बुद्धांनी परिव्रज्या धारण केल्यानंतर मानवी दु:खाच्या शोधार्थ अभ्यास केला, त्यासाठी त्यांनी अनेक प्रकारच्या विद्याचे ग्रहण केले. त्या आत्मसाद केला. त्यांनी अनेक प्रकारच्या खडतर आणि कष्टप्रद अशा कसोटींचे ग्रहण केले. अखेर त्यांना गया येथे एका पिंपळाच्या वृक्षाखाली ज्ञानप्राप्ती झाली व जगातील दु:खाची दोन कारणे आहेत व त्या दोन समस्या आहेत. १) जगात दु:ख आहे. २) हे दु:ख कसे नाहीसे करावे व मानवी जीवनाला कसे सुखी करावे, या दोन प्रश्नावर चिंतन करून गौतम बुद्धांनी दु:निवारणाचा मार्ग शोधून काढला. यालाच गौतम बुद्धांची 'सम्यक संबोधी' असे म्हणतात.

गौतम बुद्धांनी आपल्याला प्राप्त झालेल्या ज्ञानाच्या आधारे सर्व मानवाचे जीवन सुखी करावे या कारणास्तव बौद्ध धम्माची स्थापना केली_व त्याद्वारे आपल्या शिकवणूकीस प्रारंभ केला. गौतम बुद्धांनी चार आर्यसत्ये, अष्टांग मार्ग, पंचशील तत्त्वे याद्वारे उपदेश केला व यांचे पालन केले असता माणूस दु:खमुक्त होवू शकतो अशी मांडणी केली. प्रज्ञा, शील, करूणा हे गौतम बुद्धांच्या शिकवणूकीचे मूलभूत तत्त्व व सार होता.

## प्रकरण दुसरे

## गौतम बुद्धांचे वर्ण व जातीव्यवस्थाविषयक विचार

गौतम बुद्धांचा जन्म व कालखंड उत्तर वैदिक काल म्हणून ओळखला जातो. उत्तर ऋग्वेद काळामध्ये समाजावर वैदिक धर्मावर अधिष्ठित यज्ञयाग, चातुर्वण्यव्यवस्था, श्रेष्ठ-कनिष्ठत्त्व याचे वर्चस्व होते. यज्ञामध्ये मोठ्या प्रमाणात हिंसा केली जात होती. तेव्हा भगवान गौम बुद्धांनी आपल्या तत्त्वज्ञानाद्वारे या यज्ञयागाला व चातुर्वण्यव्यवस्थेला विरोध केला. गौतम बुद्धांनी कूटदंत सूक्ताद्वारे आदर्श यज्ञ निर्मिती केली व यज्ञीय संस्थेची नैतिक तत्त्वाच्या आधारे पुनप्रस्थापना केली. गौतम बुद्धांना

यज्ञामध्ये केली जाणारी हिंसा मान्य नव्हती. त्याबरोबर त्यांना समाजावर असलेले ब्राह्मणांचे वर्चस्व मान्य नव्हते. गौतम बुद्धांनी वेद-प्रामाण्यालाही विरोध केला. एखाद्या धर्मग्रंथामध्ये लिहिले आहे म्हणून, त्यावर विश्वास ठेवू नका तर तुमच्या बुद्धीला जे तर्कसुसंगत आणि योग्य वाटते त्यावरच विश्वास ठेवा असे, गौतम बुद्ध सांगतात.

गौतम बुद्धांनी जन्माधिष्ठित चातुर्वण्यव्यवस्थेला विरोध केला. त्यांनी ऋग्वेदातील पुरूषसुक्ताची ईश्वरीय संकल्पना नाकारली. त्यांच्या मते, कोणतीही वर्ण व जात ही जन्मावरून ठरत नसते तर ती त्या-त्या व्यक्तीच्या कर्मावरून ठरते. अश्वलायन सूत्र, एसूकारी सूत्र, अम्बट्ठ सूत्र याद्वारे जन्माधिष्ठित वर्णव्यवस्थेला विरोध करतात तर कोणताही माणूस उच्च विद्या व सदाचाराचे साह्याने श्रेष्ठ बनतो. एखादी क्षत्रिय कुळात जन्मलेली व्यक्ती आपल्या उच्च शीलाच्या व विद्येच्या आधारे ब्राह्मण बनू शकते असे गौतम बुद्ध सांगतात. तर एखादी ब्राह्मण कुळात जन्मलेली व्यक्तीसुद्धा आपल्या कुकर्मामुळे, पापामुळे शूद्र बनू शकते असे ते सांगतात. गौतम बुद्ध ब्राह्मण या शब्दाला जातीवाचक रूप न देता ते त्याला गुणवाचक स्वरूप देतात. ते सांगतात की, श्रेष्ठत्त्व किंवा कनिष्ठत्त्व माणसाच्या कर्मावरून ठरते.

गौतम बुद्ध जन्माधिष्ठित जातीव्यवस्थेलाही विरोध करतात, जातीव्यवस्थेला विरोध करताना ते म्हणतात की, निसर्गागामध्ये जेवढे काही पशुपक्षी आहेत. त्यांच्या विभिन्न जाती आहेत. त्यांच्या जातीतही उपजाती आहेत. त्यांच्यामध्ये स्पष्ट अशी भेद दर्शक लक्षणे आढळून येतात. परंतु, मनुष्य प्राण्याची सर्व लक्षणे, गुणधर्म सारखे आहेत. त्याच्यात कोणताही अवयव भेद नाही, तेव्हा मनुष्य प्राण्याचे सर्व अवयव व गुणधर्म सारखे आहेत. त्याच्यात कोणताही अवयव भेद नाही, तेव्हा मनुष्य प्राण्याचे सर्व अवयव व गुणधर्म सारखे असल्यामुळे त्यांच्यामध्ये जातीभेद ठरविणे अशक्य आहे. असे गौतम बुद्ध सांगतात. परंतु ते सांगतात की, एखाद्याच्या कर्मावरून जातीभेद ठरविणे शक्य आहे. उदा.- एखादा ब्राह्मण कुळात जन्मलेला व्यक्ती गाईचे पालन करून निर्वाह करीत असेल तर आपण त्यास ब्राह्मण न म्हणता गवळीच म्हटले

पाहिजे. जो शिल्पकलेवर उपजीविका करतो त्यास कारागीर तर, जो व्यापार करतो त्यास वाणी म्हटले पाहिजे असे गौतम बुद्ध सांगतात.

गौतम बुद्धांनी क्षत्रिय मंडळाच्या सिद्धांताद्वारे समाजात वर्णाची निर्मिती कशी झाली आहे याची माहिती दिली आहे. ते व्यक्तीच्या कर्मावरून त्याचा वर्ण ठरला असे सांगतात. गौतम बुद्धांनी एखादी व्यक्ती ब्राह्मण कुळात जन्मली म्हणून ती ब्राह्मण ठरत नाही तर ती त्याच्या कर्मावरून ठरत असते, हे सांगतानाच त्यांनी खरा ब्राह्मण कोणास म्हणावे याचेही विवेचन केले आहे. सोणदण्ड सुत्तामध्ये ते खऱ्या ब्राह्मणाची व्याख्या करताना म्हणतात की, एखादी व्यक्ती ब्राह्मण कुळात जन्मली आहे, तो वेदात पारंगत आहे, रंगाने गोरा आहे, दक्षिणा घेण्यात पहिला किंवा दुसरा आहे म्हणून तो ब्राह्मण ठरत नाही तर तो उच्च शीलाने आणि विद्येने श्रेष्ठ असेल तरच ब्राह्मण ठरतो असे ते दाखवून देतात. म्हणजेच एखादी व्यक्ती क्षत्रिय अथवा वैश्य वर्णात जन्मली तर ती उच्च शीलाने आणि विद्येने ब्राह्मण बनू शकते. जो मनुष्य शीलसंप्पन आणि कर्तव्यदक्ष असतो, तोच ब्राह्मण होय.

## प्रकरण तिसरे

## गौतम बुद्धांचा सामाजिक कराराचा आणि राज्यउत्पत्तीचा सिद्धांत

जगामध्ये आणि प्राचीन भारततही समाजव्यवस्था व राज्यउत्पत्तीविषयक अनेक लहान मोठे सिद्धांत मांडण्यात आले आहेत. प्राचीन भारतात ऋग्वेद, अथर्ववेद, महाभारत इत्यादी ठिकाणी असे सिद्धांत मांडले आहेत. सध्या जगामध्ये हॉब्ज-लॉक-रूसो यांचे सामाजिक करार व राज्यउत्पत्तीसंबंधीचे सिद्धांत प्रसिद्ध आहेत. गौतम बुद्धांनीही सामाजिक कराराचा आणि राज्याच्या उत्पत्तीचा सिद्धांत मांडला आहे. तो आपणास दीघनिकाय ग्रंथाच्या दुसऱ्या व तिसऱ्या भागात दिसून येतो. गौतम बुद्धांनी मांडलेले हे दोन्ही सिद्धांत महत्त्वाचे आहेत. त्यांच्या मते, प्राचीन काळामध्ये मनुष्याचे शरीर हे वायूरूप होते. नंतर कालांतराने पृथ्वीचा उदय झाला. पृथ्वीचा उदय झाला असता माणसांनी पृथ्वीवर असलेले चविष्ट द्रव्य चाखले. त्यामुळे माणसाचे दिव्यतेजपुंज वायूरूप अवस्था नष्ट होवून त्यांचे शरीर घनरूप बनले. तेव्हा त्यांच्यात

भूक, तहान, लैंगिक वासना, प्रेम इत्यादी भावना व गरजा निर्माण झाल्या, त्या गरजा पूर्ण करण्यासाठी माणूस जास्तीत-जास्त प्रयत्न करू लागला. माणूस स्वार्थी बनला. व माणसाच्या या स्वार्थीवृत्तीतून सर्वत्र अराजकता निर्माण झाली तेव्हा या अराजकतेतून सुटका करून घेण्यासाठी माणसांनी एकत्र येवून जे दोषी आहेत त्यांना शिक्षा देण्याचे ठरविले व जेव्हा मनुष्य या ठिकाणी एकत्र आला तेव्हाच समाज संस्थेची निर्मिती झाली. परंतु माणसापुढे नंतर असा प्रश्न निर्माण झाला की, एखादी गोष्ट चूक आहे किंवा नाही हे कोण ठरविणार? गुन्हेगाराला शिक्षा कोण करणार? तेव्हा पुन्हा माणसे एकत्र आली व त्यांनी आपल्यामधून एका सर्वात सुंदर, कार्यकुशल आणि उत्तम प्रकृत्ती असलेल्या व्यक्तीची आपला नेता म्हणून निवड केली. त्यास 'महासम्मत', 'राजा', 'खत्तिय' अशी पदनामे मिळाली. तेव्हा त्याने लोकांचे रक्षण करण्याचे व त्यांच्यातील शेतीसंबंधीचे मतभेद मिटविण्याचे मान्य केले, त्याबदल्यात लोकांनीही आपल्या उत्पन्नातील काही भाग भात त्यास कर म्हणून देण्याचे मान्य केले. तेव्हा अशा पद्धतीने समाज व्यवस्थेतून राज्यसंस्थेची निर्मिती झाली.

गौतम बुद्धांनी वर जो सामाजिक कराराचा सिद्धांत मांडला त्याचे मुल्यमापन केल्यानंतर आपल्याला असे लक्षात येते की, हा करार लोकशाहीवादी आहे. तो ईश्वरनिर्मित नाही तर माणसांनी परस्पर संरक्षणासाठी हा करार केला आहे. माणसांनी अराजकतेतून सुटका करून घेण्यासाठी हा करार केला आहे. गौतम बुद्धांनी हा जो सामाजिक कराराचा आणि राज्याच्या उत्पत्तीचा सिद्धांत आहे त्यामध्ये प्रथमच ईश्वरीय हस्तक्षेप टाळून मानवी बुद्धीनिष्ठेला आणि कृतीला महत्त्वाचे स्थान दिले. गौतम बुद्धांचा हा सिद्धांत लोकशाहीवर अधिष्ठित होता कारण यामध्ये माणसानी सर्वानुमते एकत्र येवून निर्णय घेतला होता. गौतम बुद्धांनी मांडलेला समाज उत्पत्तीचा व राज्यउत्पत्तीचा सिद्धांत इतर सिद्धांताशी तुलना करता सोपा व सुटसुटीत आहे.

# प्रकरण चौथे

## गौतम बुद्धांचे राजकीय विचार

प्रस्तुत चौथे प्रकरण हे या शोधप्रबंधाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण या प्रकरणामध्ये गौतम बुद्धांच्या सर्व राजकीय विचारांची मांडणी करण्यात आली आहे. गौतम बुद्धांचे हे राजकीय विचार आजच्या राजकीय व्यवस्थेला आणि राज्यकर्त्यांना प्रेरणादायी ठरणारे असेच आहेत.

गौतम बुद्धांचे प्राचीन भारतीय राजकीय विचारालाच नव्हे तर संपूर्ण राज्यशास्त्राला असणारे महत्त्वाचे योगदान म्हणजे, त्यांनी धर्म, नीती आणि राजकारण यांचा केलेला सुसंबद्ध मेळ होय. गौतम बुद्धांनी राजकारणाला धर्म आणि नीतीचे अधिष्ठान असावे असा आग्रह धरला. नीती व धर्मावर अधिष्ठित असलेल्या राज्यव्यवस्था टिकून राहू शकतात, तर ज्या राजकीय व्यवस्था अधर्म, अनीती, दुराचार यांनी ग्रासल्या जातात त्यांचा ऱ्हास होतो, असे गौतम बुद्ध सांगतात. तथागत गौतम बुद्ध राजा, अमात्य यांनाही धर्माने, नीतीने राज्या करण्याचा उपदेश करतात. त्यांच्या मते, राज्यातील राज्यकर्ता वर्गच जर चुकीने, अनैतिक मार्गाने जावू लागला तर राज्यातील सर्वच लोक त्यांचे अनुकरन करतात, त्यामुळे राजाने व अमात्यानी उच्च शीलाने, सदाचााने वागावे, सतत प्रजाहितदक्ष राहून राज्यकारभार करावा असे गौतम बुद्ध सांगतात. ज्र राजा, नेता नीतीने, धर्माने वागणारा असेल तर संपूर्ण प्रजाही नीतीवान बनते. राजाने नीतीवान समाज बनविण्यासाठी सतत प्रयत्नशील राहावे. गौतम बुद्ध जातक कथांतूनही नीतीवर अधिष्ठित समाजकारण आणि राजकारणाचा पुरस्कार करतात.

गौतम बुद्धांनी धम्मविजयाची जी संकल्पना मांडली ती अत्यंत महत्त्वाची आहे. गौतम बुद्धांच्या दोन्ही संकल्पना विश्वव्यापी स्वरूपाच्या आहेत. गौतम बुद्धांनी धम्मचक्र प्रवर्तन करणारा धम्मचक्र प्रवर्तक आणि संपूर्ण जगावर राजकीय अधिपत्य मिळविणारा चक्रवर्ती राजा समान मानला आहे. कारण धम्मचक्रप्रवर्तन करणारा धम्मप्रवर्तक व चक्रवर्ती राजा संपूर्ण जगावर आपले अधिपत्य निर्माण करताना ते धम्माचा अवलंब

करतात. ते आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या बळाचा वापर न करता, आपल्या धम्माच्या आधारे लोकांस शरण येण्यास भाग पाडतात. चक्रवर्ती राजा आणि धम्मचक्रप्रवर्तक हे स्वत: धम्माचे व त्यातील पंचशीलानी युक्त असतात. त्यांच्या मनामध्ये सर्व मनुष्यांच्याप्रती आत्मियता असते. धम्मचक्रप्रवर्तक जगामध्ये शांतता नांदावी यासाठी आपल्या धम्माचा प्रसार करीत असतो.

बुद्धांनी जी चक्रवर्ती राजाची संकल्पना मांडली ती महत्त्वाची आहे. चक्रवर्ती राजाच्या माध्यमातून गौतम बुद्धांनी आदर्श विश्वराज्याचीच संकल्पना मांडली असे म्हणावे लागेल. गौतम बुद्धांनी जी चक्रवर्ती राजाची संकल्पना मांडली. तो चक्रवर्ती राजा सातरत्नांनीयुक्त असतो. तो चतुरंग सैन्यानीयुक्त असतो. तो जेव्हा विश्वविजयासाठी आपल्या चतुरंग सेनेसह बाहेर पडतो तेव्हा तो युद्ध न करता, कोणत्याही बळाचा वापर न करता विजय मिळवितो व नंतर तेथे शांतता व सुव्यवस्था निर्माण करून धम्ममार्गाने वागण्यास तेथील लोकांना प्रवृत्त करतो. चक्रवर्ती राजा पंचशीलाची अंमलबजावणी करणारा व त्यानुसार वागणार असतो.

लिच्छवी सेनापती सिंहास उपेदश करताना गौतम बुद्ध म्हणतात, मी माझ्या शिष्यांना शिकविताना मी सांगतो की, कोणतेही वाईट कृत्य करू नका. नेहमी चांगले बोला आणि चांगला विचार करा. काय, वाचा, मन स्वच्छ ठेवा. पंचशीलाचे पालन करा. आणि मी यालाच माझा क्रियावाद समजतो. त्यानंतर पुन्हा एका सिंहाच्या प्रश्नावर उत्तर देताना म्हणतात की, सेनापतीने अथवा कोणत्याही राजकीय सत्तेने आपल्या राज्यात जे दोषी असतील त्यांना शिक्षा केलीच पाहिजे, त्याचबरोबर जे सज्जन आहेत धर्माने वागतात त्यांना पुरस्कारिले पाहिजे. जगात जी युद्ध चालू असतात ती सर्वच दु:खदायक असतात. परंतु युद्ध टाळण्याचे सर्व उपाय वापरून ही जर कोणी त्याचप्रमाणे वागला तर त्याला त्या युद्धाबद्दल दोषी ठरविले पाहीजे. म्हणजेच माणसाने नीतीमत्ता आणि सत्य यांच्यासाठी युद्ध केले तर ते योग्यच असते व ते न्याय्य असते. व क्षत्रिय वीराचे ते एक कर्तव्यच असते. मात्र त्याने युद्धात विजयी झालो म्हणून

हरकून न जाता विजय हा क्षणभंगूर असतो हे लक्षात ठेवले पाहिजे. गौतम बुद्धांनी शिकविलेली अहिंसा मूलभूत होती परंतु निरपेक्ष नव्हती.

बौद्ध धम्मामध्ये शिक्षेची जी संकल्पना मांडली आहे ती महत्त्वाची आहे. बौद्ध धम्मातील गुन्हेगारास शिक्षा करण्याऐवजी त्याच्या पुनर्वसनास अग्रक्रम देण्यात आला आहे. बौद्ध धम्मातील सर्व शिक्षा आपणास सौम्य आणि अहिंसात्मक असल्याच्या दिसून येतात. गुन्हेगारास शारिरीक त्रास होईल अशी शिक्षा न देता त्याच्या मानसिक परिवर्तनाला बौद्ध धर्मात अग्रक्रम दिल्याचे दिसून येते. राजाने आपल्या राज्यातील गुन्हेगारांचा बंदोबस्त करताना त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी प्रयत्न करावेत व राज्यात ज्याच्या-त्याच्या मागणीनुसार, कर्जे, इतर सोयी, सुविधा, भांडवल पुरवावे. त्यामुळे एकतर राज्याचा विकास होण्यास मदत होते, तर दुसऱ्या बाजूने राज्यातील सर्व लोक आपापल्या कामामध्ये मग्न राहातात, त्यामुळे राज्यात कोणीही बेकार राहात नाही. त्यामुळे चोऱ्या, दरोडे ही घडून येत नाहीत. त्यामुळे राजाने आपले ध्येय-धोरण हे विकासाभिमुख राबवावे असे गौतम बुद्ध सांगतात.

गौतम बुद्धांनी अहिंसात्मक मार्गाने युद्ध टाळण्याचा उपाय शाक्य संघाच्या सभेत मांडला. त्याच्या मते, कोणतेही युद्ध हे वाईटच असते. युद्धात दोन्ही ही पक्षांचे नुकसानच होत असते. तेव्हा दोन्ही देशांनी एका लवाद मंडळाची निर्मिती करून शांतता व सामंजस्य कराराच्या आधारे युद्ध मिटवावे असे गौतम बुद्ध सांगतात. गौतम बुद्धांनी सांगितलेला हा उपाय आजही प्रेरणादायी आहे.

गौतन बुद्धानी मघाच्या गोष्टीच्या आधारे जे राजकारणाचे नवे प्रतिमान मांडले ते महत्त्वाचे आहे. गौतम बुद्ध याद्वारे असे सांगतात की, समाजकारण आणि राजकारण करणाऱ्याने स्वत:पासून सुरूवात केली पाहिजे. गावातील सर्व लोक मघाला वेडा समजतात पण तो त्याकडे दुर्लक्ष करतो व आपले गावची सेवा करण्याचे व्रत तसेच पुढे चालू ठेवतो. तो गावातील सर्व कचरा, घाण बाहेर नेवून टाकत होता परंतु गावकरी त्याला मदत करण्याऐवजी दोषच देत असत. एके दिवशी ही गोष्ट त्या गावच्या दोन तरूणांच्या लक्षात येते व ते त्याला मदत करतात. त्याच्या उपदेशाचे

पालन करतात हळूहळू त्याला आणखी लोक येवून मिळतात. व त्या गावचा आणि पर्यायाने त्या पंचक्रोशीचाच कायापालट होतो. सर्व लोक नीतीने वागतात, पंशीलाचे पालन करतात. तेव्हा कोणत्याही समाज कार्याची सुरूवात आपण स्वत: पासून केली पाहिजे असे अधोरेखित करण्याचा प्रयत्न गौतम बुद्धांनी केला आहे.

गौतम बुद्धांनी लोकशाही मूल्याचा व त्यावर आधारलेल्या गणराज्य व्यवस्थेचा पुरस्कार केला. गौतम बुद्धांनी जे लोकशाही व गणराज्यपद्धतीविषयक विचार मांडले ते आजही आपणास मार्गदर्शक ठरणारे आहेत. गौतम बुद्धांच्या काळामध्ये प्राचीन भारतात अनेक स्वतंत्र गणराज्ये अस्तित्त्वात होती. गौतम बुद्धांचा जन्म शाक्य गणराज्यात झाला होता तर लिच्छवी हे वर्धमान महावीराचे गणराज्य होते. भगवान गौतम बुद्धांनी आपल्या शाक्य गणराज्यामध्ये ही लोकशाहीतील बहुमताच्या तत्त्वाचा आदर राखूनच देशत्याग केला होता. त्यानंतर त्यांनी आपल्या धम्माच्या प्रसारासाठी जेव्हा धम्मसंघाची स्थापना केली त्या संघाचीघटना आणि अंतर्गत कामकाजाची पद्धतसुद्धा लोकशाही तत्त्वावर आधारीत होती. प्राचीन भारतामध्ये गणराज्य शासनपद्धतीचा विकास झाला होता. व प्राचीन भारतीय गणराज्यातील तत्त्वांचाच गौतम बुद्धांनी स्वीकार करून आपल्या धम्मसंघाच्या कामकाज पद्धतीची निर्मिती केली होती असे विचार अनेक विचारवंतानी मांडले आहेत. राजाशिवाय चालविल्या जाणाऱ्या किंवा स्थूलअर्थाने जनमानसानुसार लोकनियंत्रणाखाली असणाऱ्या शासनपद्धतीस गणराज्य असे म्हणतात. भगवान गौतम बुद्धांच्या भिक्खूसंघामध्ये सर्वांना खुला प्रवेश होता. तेथे समानता होती. धम्मसंघाचे कामकाज सर्वसंमत्तीने चालविले जात होते. धम्मसंघाच्या कामकाजासंदर्भात कोणाही एका व्यक्तीला अधिकार नव्हते. धम्मसंघाची स्वतंत्र कायदेविषयक, कार्यकारीविषयक आणि न्यायविषयक व्यवस्था अस्तित्त्वात असल्याचे दिसून येते. गौतम बुद्धांनी लिच्छवी गणास जो उपदेश केला त्यावरून त्यांना गणराज्य पद्धतीची सर्व तत्त्वे माहित होती असे दिसून येते. ते गणराज्य व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी मार्गदर्शन करताना म्हणतात की, त्या गणांनी वारंवार सभा आयोजित कराव्यात. त्या सभेमध्ये एकमताने निर्णय घेतले जावेत. व ऐक्याच्या आधारेच आपल्या सर्व निर्णयांची

८) गौतम बुद्धांनी मघाच्या उदाहरणाद्वारे राजकारणाचे नवे प्रतिमान उभारले व स्वत: पासून बदलास सुरूवात करा असा संदेश दिला. गौतम बुद्धांचे हे प्रतिमान आजच्या धक्काधकीच्या जीवनात व समाजकारण आणि राजकारण करणाऱ्यांना व त्यापासून दूर जाणाऱ्यांना ही मार्गदर्शक आणि प्रेरणादायी आहे.

९) गौतम बुद्धांनी चक्रवर्ती राजाच्या माध्यामातून संपूर्ण विश्वराज्याची रूपरेषा रेखाटली.

१०) गौतम बुद्धांनी जो राजकीय प्रतिकाराचा सिद्धांत मांडला तो आज ही उपयुक्त वाटतो. कारण बऱ्याच वेळा राज्यसंस्था आपल्या पाशवी बहुमताच्या जोरावर चुकीचे निर्णय घेत असते.

११) गौतम बुद्धांच्या संपूर्ण राजकीय विचारांचा मूलभूत विचार हा नीती, सदाचार आणि सर्वांचे हित हा होता.